Vol 2 Issue 11 Aug 2013

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 2, Issue. 11, Aug. 2013
ISSN:-2249-894X
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# शिवचरित्राचा शोध आणि बोध

*अनिल माणिकराव बैसाणे*

माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

**सारांश :**

या देशात अनेक महापुरुष होवून गेलेत. त्यांनी हा देश घडविण्यासाठी त्या त्या काळातील समाजव्यवस्थेला विधायक वळण लावणारं कुशल नेतृत्वही पुरविले. त्यांच्या समर्पणानच आपल्याला यशस्वीपणे वाटचाल करता येत आहे. अशा महापुरुशांचे व्यक्तिमत्व अभ्यासतांना त्यांना माणूस म्हणून ओळखण्याचा शहाणपणा मात्र न दाखवता देवत्व अर्पूण पूजा करण्यात धन्यता मानतो.

## प्रस्तावना :

शिवराय हे महाराष्ट्राला पडलेले एक स्वप्न. कारण शिवकाळाचा वास्तव अनुभव आपल्याला असा येईल असे जर कोणी म्हटले असते तर कोणीही विश्वास ठेवला नसता अशी शिवपूर्वकाळातील या देशातील सर्वांगीण परिस्थिती होती. प्रतिगामी प्रवृत्ती, लाचार, गुलामीची मानसिकता, भेद अशा अनेक बाबींनी व्यवस्थेत ठाण मांडले होते. मनुष्यत्वाची जाण नव्हती. या देशतील सर्व विद्वान पंडीत, पराक्रमी, राजे–रजवाडे इस्लामी चाकरीत धन्य पावत होते. प्राचीनकाळी चंद्रगुप्त मौर्य, अशोक, हर्षवर्धन यासारख्या सम्राटांच्या स्वतंत्र आणि सार्वभौम साम्राज्याच्या संकल्पना विरल्या होत्या. महाराष्ट्र देशात अनेक पराक्रमी सरदार घराणी होत्या. परंतु हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेचे वास्तव दर्शन घेण्याची ताकद त्यांच्यात नव्हती. ही किमया ज्यांनी साध्य केली ते छत्रपती शिवराय ! खरतर ह्या देशात मुस्लीम सत्तेचा विरोध मोडून स्वतंत्र व सार्वभौम राज्यस्थपनेचे दुर्मिळ कार्य शिवरायांनी साध्य केले. ते स्वराज्य मुघल बादशहाची सर्व ताकद पणाला लावूनही नष्ट करता आले नाही. उलट या मुगल बादशहाला या स्वराज्याच्या मातीतच गाडून घ्यावे लागले. अशा या स्वराज्य संस्थपकांच्या कार्याचा आपल्याला परिचय व्हावा या उद्देशानं आपणाकरिता थोडसे.[1]

महाराजांचे कार्य आणि कर्तृत्व पहात असतांना कोणत्या बाबींचा आपण शोध घ्यावा आणि कोणत्या बाबींचा निरर्थक अभ्यास आपण टाळावा हे समजण्याचा सुज्ञपणा अभ्यासकांनी हेरला पाहिजे. कारण नको त्या गोष्टींचा ऊहापोह करणे म्हणजे शिवचरित्राचा अभ्यास करणे होय का ? अजिबात नव्हे. आपण अशा घटनांचा आढावा घेतला तर महाराजांचा जन्म कधी झाला ? महाराज साक्षर होते का ? महाराजांचे गुरु कोण ? अशा अनेक बाबींचा उल्लेख केला जातो. परंतु आपण काय स्वीकारले पाहिजे याचा खुलासा मी वरील बाबींच्या अनुषंगाने घेणार आहे.

## जन्मतिथीचा वाद

कृष्णाजी अनंत सभासद लिखित बखरीत महाराजांच्या जन्मतिथीचा उल्लेखच नाही. या विश्वासनीय बखरीत नोंद नसल्यामुळे हा वाद निर्माण झाला. अनेक संशोधक अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलीत. अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेने ठराव क्र. 7 द्वारे 19 फेब्रुवारी 1630 वार शुक्रवार रोजी महाराजांचा जन्म झाल्याचे इतिहास संशोधकांनी व अभ्यासकांनी मान्य केले असल्याचे शासनाला परिपत्रक काढून कळविले. शासनाने हीच जन्मतारीख मान्य केली. महाराजांचा जन्म शिवनेरीवर झाला हे मात्र निश्चित आहे.2 अयोध्या येथील सूर्यवंशीय देवाजी राणा हा महाराष्ट्रात येवून राहिला. पुढे याच वंशात सिशोदे नाव बदलले जावून भोसले झाले. याच वंशात शिवाजी महाराज होवून गेलेत.

प्रतिपच्चन्द्रलेख्व वर्धिष्णुविश्र्ववंदिता ।

**Title:** *शिवचरित्राचा शोध आणि बोध*
**Source:Review of Research [2249-894X]** *अनिल माणिकराव बैसाणे* **yr:2013 vol:2 iss:11**

शाहसूनो : शिवस्यैष मुद्रा भद्राय राजते ।

प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारी, विश्वाने वंदिलेली, शहापुत्र शिवाची ही मुद्रा लोककल्याणसाठी शेभ्त आहे. जनकल्याणासाठी असलेली ही मुद्रा इ. स. 1639 मधील होती. म्हणजेच महाराज 9 ते 12 वर्षाचे असतांनाच त्यांनी लोककल्याणासाठी राज्यकारभारास प्रारंभ केल्याचे दिसते.

### *महाराजांच्या साक्षरतेविषयी*

महाराज हे साक्षर होते. हे अनेक ऐतिहासिक दाखल्यांवरून स्पष्ट करता येईल. महाराज हे मुळाक्षरे शिकले असल्याचा उल्लेख शिवभारतातील नवव्या अध्यायात आहे. तर दहाव्या अध्यायात महाराजांनी श्रृती, स्मृती, महाकाव्ये, पुराणे व सर्व प्रकारचे लष्करी शिक्षण घेतल्याचा उल्लेख आढळतो. 91 कलमी बखरीत 20 व 21 व्या अध्यायात शिवरायास शहाणे केले असल्याचा उल्लेख वाचावयास मिळतो. शास्त्रांचे जाणकार असलेल्या महाराजांनी बाळाजी आवजी मार्फत राज्य व्यवहार कोष, करण कौस्तुभ, लेखन प्रशस्तीसारखे ग्रंथ लिहून घेतलेत. तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयातील एका हस्तलिखितात शिवरायांमध्ये अनेक गुणांचा समुच्चय झाला असल्याची नोंद आहे. तर महाराजांची विद्वत्तेची थोरवी गातांना ॲबे कॅरे म्हणतो की, महाराजांना भूगोलाचा व्यासंग होता. त्यांनी देशातील सर्व मुलुखंचे नकाशेच तयार करून घेतले होते. महाराजांचे मराठी, संस्कृत, कन्नड, उर्दू, हिंदी, तुलगू, यासारख्या सहा भाषांवर प्रभुत्व होते.[3]

### *प्रजाहितदक्ष राज्यकर्ता*

महाराजांच्या प्रजाहितदक्ष राज्यकारभाराविषयीच्या नोंदी अनेक अस्सल ऐतिहासिक कागदपत्रातून वाचावयास मिळतात. त्यांच्या राजमुद्रा अंकित झालेली जवळःजवळ दोनशे पत्रे संशोधकांनी प्रकाशित केली आहेत. त्यातील 135 क्रमांकाच्या पत्रात महाराजंनी रयतेविषयीची तळमळ व्यक्त केली आहे. या पत्रात ''तुम्ही जनतेला उपद्रव दिला तर मुघलांपेक्षाही आपणस भयंकर मानतील. रात्री दिव्याची वात उंदीर नेईल. तर गरीब कुणब्यांच्या शेतीची नासाडी होईल.'' अशा आज्ञा केल्या आहेत. तर 162 कलमाच्या पत्रात रामजी अनंत या प्रभानवल्लीच्या सुभेदारास चोरी न करण्याविषयी फर्मविले आहे.

धर्माची मक्तेदारी असलेल्या शास्त्री पंडीताची तमा न बाळगता सईबाईचे भाऊ बजाजी निंबाळकरांचे शुद्धीकरण करून त्यांना स्वधर्मात घेणारे महाराज हे नक्कीच आपल्या प्रजेची कदर करणारे होते.

रांझेगावचा पाटील बाबजी गुर्जरास बद अंमलप्रकरणी प्रायश्चित्त तर दिलेच परंतु तो निपुत्रिक असल्यामुळे त्याचे पालनपोषण करण्याची तयारी दाखविणऱ्या सोनजी बनाजीला पाटीलकीसह बाबाजीला सोनाजीच्या हवाली केले. महाराजंची परधर्मसंहिष्णुता मुस्लिम शासनकाळात हिंदूवर अनन्वित अत्याचार झालेत. शिवरायांच्या काळातच होवून गेलेल्या औरंगजेब बादशहा तर कट्टर धर्मिक होता. हिंदूवर जिझिया कर लादून आर्थिक शोषण केले. मात्र ह्याचवेळेस महाराजांच्या 6, 22, 55, 58 क्रमांकांच्या पत्रामध्ये मुस्लिम देवस्थनांनाही इनामे आणि सवलती दिल्या असल्याच्या नोंदी आहेत.4 महाराजांच्या सैन्यात मराठा व मुसलमानांप्रमाणेच महार, मांग, रामोशीसारख्या अनेक जाती जमातींचा सहभाग होता. त्यांच्या घोडदलात निम्म्यापेक्षाही जास्त घोडेस्वार हे मुस्लिम होते. महाराजांचा सरनौबत नुरखान बेग, तोफखाना प्रमुख इब्राहिमखान, महाराजांचा सचिव हा पारशी भाषेचा पंडित काझी हैदर हे मुस्लिम सेवक महाराजांच्या निष्ठावंत सैनिकांपैकी होते.

महाराजांनी आपल्या प्रशासनात कोणत्याही धर्माची तत्त्वे घुसडली नाहीत. स्वराज्य द्रोही असलेल्या लौकिक हिंदूंच्याही विरोधात महाराजांनी लढाया केल्या असल्याच्या नोंदी इतिहासात आढळतात.

### *स्त्री पावित्र्याची कदर करणारे राज्यकर्ते*

भारताच्या इतिहासातील सर्वच राजेमहाराजांची चरित्रे अभ्यासलीत तर स्त्री पावित्र्याची कदर करणाऱ्या शिवरायांशी कोणाचीही तुलना होवू शकरणार नाही. ''दौंडीत बाया–बापड्यांवर हात न टाकणे या बाबीने गैर–बाका बरताव जाहलीयास हात कलम केले जातील.'' अशा आज्ञा महाराजांच्या असत. कल्याण सुभेदाराच्या सुनेच्या प्रकरणाला जरी अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध नसली तरी त्यातून महाराजांची स्त्री पवित्रता कमालीची दिसते. कल्याण सुभेदार सुनेला महाराजांना भेट करणाऱ्या आबाजीनेच गोळे सरदार सुनेलाही पकडून महाराजांना नजर केली होती. मात्र महाराज क्रोधीत होवून या आबाजीला स्वराज्यातून रद्दपार केले.

बदअंमल करणाऱ्या रांझेगावच्या बाबाजी भिकाजी गुर्जर या पाटलास हातपाय तोडण्याची जबर शिक्षा दिली. अशाच एका गुन्ह्यातही पदाजी यशवंतराव सिवतकर याचे डोळे काढण्याची शिक्षा दिली होती.

### राष्ट्रीय लष्कराची उभारणी

महाराजांच्या स्वराज्य उभारणीत सर्वच जातीजमातीच्या लोकांचा भरणा होता. महाराजांकरिता प्राणार्पण करण्याची त्यांच्यात स्पर्धाच असे. असे अनेक प्रसंगावरून दिसून येते. इ.स. 1648 मध्ये स्वराज्यावर फतेह खानाच्या रूपाने विजापूरी संकट आले असता काऊजी मल्हारच्या नेतृत्वाने गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवबा इंगळे, भिकाजी चोर, भैरोजी चोर यांनी पराक्रम गाजवून स्वराज्याचे रक्षण केले. अफजलखान प्रसंगात तर जिवामहाला नावाच्या कनिष्ठ जातीत जन्मलेल्या अंगरक्षकाने महाराजांचा प्राण वाचविला. या प्रसंगात अफजलखानाला ठार मारल्यामुळे विजापूर दरबाराने कर्नुल प्रांताचा सिद्धीजौहर ह्या सरदारास महाराजांविद्ध पाठविले. यावेळी महाराज हे पन्हाळगडावर होते. म्हणून सिद्धीने पन्हाळला वेढा दिला. त्याचवेळेस स्वराज्यात शाहिस्तेखान चालून आल्याने पन्हाळावर जास्त दिवस राहणे हे हिताचे नव्हते म्हणून महाराजांनी सुटकेचा प्रयत्न केला. यावेळेस महाराजांचा वेश धारण करून सिद्धीच्या छावणीत अडकणारा शिवा काशीद हा न्हावी जातीचा होता. यामुळे सिद्धी गाफील राहिला व महाराजांना सुटका करून घेता आली. मात्र शिवाच्या बलिदानामुळेच ! ह्याचवेळेस सिद्धीच्या वेढ्यात सामील होवून संधी मिळताच सन्याशी वेशात गडावर जावून महाराजांना भेटणारा महादेव हा गुप्तहेर रामोशी असल्याचे वाचावयास मिळते. पुढेतर घोडखिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांनी पराक्रमाची शर्थ केली आणि शिवरायास गडावर जाता यावे म्हणून आपल्या बलिदानाने खिंड पावन केली. शाहिस्तेखानावरच्या स्वारीप्रसंगी महाराजांना इब्राहिमची मोठी साथ होती. तर महालात बागकाम करणरा ज्ञानू माळी हा महाराजांच्या हेरखात्यातील होता. त्यानेच महाराजांना महालाजवळ आणले. त्यांचा खूप फायदा महाराजांनी करून घेतला. शाहिस्तेखानाच्या स्वारीमुळे स्वराज्यातील प्रदेशची मोठी हानी झाली होती. म्हणून शत्रूकडूनच भरपाई करावी आधी बहिर्जी हा भिकारी म्हणून वावरत होता. नंतर तो भिकारी म्हणजेच महाराजांचा गुप्तहेर होय असे इंग्रज अधिकाऱ्याने ओळखले होते.[5] महाराजांनी स्वराज्याच्या कामाकरिता महाराजांचे महत्त्व ओळखले आणि सन्मानाने वागविले होते. बालेकिल्ल्यातसुद्धा महारांना प्रवेश होता.

### गमिनी कावा – नवे युद्धतंत्र

महाराजांनी मोगल्यासारख्या बलाढ्य शत्रूंना तोंड देण्याकरिता गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा अवलंब केला. शत्रू गाफिल असेल तर अचानक हल्ले करायचेत. तो पळत असता पाठलाग करायचा आणि सावध होवून प्रतिहल्ले केले तर माघार घेवून डोंगर दऱ्याखोऱ्यात पसार व्हायचे. कमीतकमी माणसे कामी आणून विजय मिळवायचा कारण गेलेला मुलुख पुन्हा जिंकता येत होता. परंतु गेलेले माणसे परत येणार कशी हे महाराजांनी ओळखले होते. प्रतिप्रतिमा म्हणून आपल्यासारख्या दिसणाऱ्या सवंगड्यांचा वापर महाराजांनीच प्रथम केला. शिवाकाशीद (पन्हाळातून सुटका प्रसंग), हिरोजी फर्जद (आग्रा सुटका प्रसंग) ही चांगली उदाहरणे देता येतील. शत्रू प्रदेशावर हल्ले करतांना दिशाभूल करायचे. जाहीर वेगळे करावे आणि प्रत्यक्ष हल्ले वेगळ्या प्रदेशावर करायचेत. सुरतेवर हल्ला केला तेव्हा औरंगाबादवर चालून जात असल्याचे घेषित केले मात्र प्रत्यक्षात सुरतेवर चालून गेले. याबरोबरच निशायुद्ध महाराजांनी सुरू केले. शहिस्तेखान प्रसंगात रात्रीचे युद्ध केले होते. कात्रज घाटात बैलांच्या शिंगांना व झाडांना फलिते बांधली व शत्रूला दिशाभूल केले. स्वतः मात्र सिंहगडाकडे निघून गेले. अशा पद्धतीने गनिमी काव्याचे युद्धतंत्र महाराजांनी अंगिकारले होते.

स्वराज्य रक्षणसाठी नाविक दलाची स्थापना करणारे महाराज हे भारतातील पहिलेच राज्यकर्ते होते.

### अंधश्रद्धांना विरोध

महाराजांविषयी अनेक गैरसमज पसरविले जातात की, महाराजांना देवी दृष्टांत देत असे. महाराजांच्या शरीरात देवीचा संचार होत असे, देवानेच महाराजांना तलवार दिली. परंतु मित्रहो यात महाराजांचा वैज्ञानिक दृष्टीकोन होता. महाराजांनी लोकभावनेचा फायदा करून घेतला. महाराजांच्या भवानी तलवारीचा इतिहास पाहिला तर गोवलेकर सावंतांनी हे पाश्चात्त्य बनावटीच हत्यार महाराजांना भेट केले होते. कारण महाराजांनी आदिलशाही सरदार रुस्तम झमानविरूद्ध लखम सावंतांना मदत केली होती. महाराजांना तीनशे होन व मानाचा पोषाख देवून सावंतांनी गौरव केला होता. म्हणजेच कोणताच चमत्कार महाराजांना मान्य नव्हता. महाराजांनी कोणत्याच किल्ल्यांच्या बांधकामानंतर सत्यनारायण दिल्याच्या नोंदी आढळत नाही. मुहूर्त, शुभ–अशुभ यावर महाराजंचा विश्वास नव्हता. त्यांच्या मोहिमा या अमावस्येच्या रात्रीच्या होत. महाराजांचा देव हा संत तुकोबांच्या शिकवणूकीप्रमाणे रंजला गांजल्यात होता[6]

ज्यावेळेस राजाराम महाराजांचा जन्म झाला तो पालथा जन्मल्याने अपशकून मानले गेले तेव्हा महाराजांनी राजाराम दिल्लीची पातशाही पालथी करील असा अर्थ सांगितला.

समुद्रमार्गे बसनूर बंदर जिंकून समुद्र पर्यटनाने हिंदू धर्म नष्ट होतो यास तिलांजली दिली असा विज्ञानवाद महाराजांनी स्वीकारला असल्याचे आपणांस दिसते.

### संदर्भसूची

1.कुलकर्णी अ. श., शिवकालीन महाराष्ट्र, सामाजिक–आर्थिक जीवनाचा अभ्यास, राजहंस प्रकाशन, पुणे.
2.पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृ. 38, 39.
3.देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 2010, पृ. 75.
4.तत्रैव, पृ. 149.
5.कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1994, पृ. 89.
6.सरदेसाई बी. एन., मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृ. 249.



# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net